# त्रिवेणी इंजिनीअरिंगच्या समभागविक्रीस आज प्रारंभ

पुणे : त्रिवेणी इंजिनीअरिंग ॲण्ड इंडस्ट्रीज लि. या कंपनीच्या पाच कोटी समभागांच्या विक्रीस १८ नोव्हेंबर रोजी सुरुवात होत असून, २५ नोव्हेंबर रोजी ही खुली विक्री बंद होणार आहे. एक रुपया मूल्याच्या या समभागांवरील अधिमूल्य बुक बिल्डिंग प्रक्रियेद्वारा ठरविण्यात येणार असून, त्यासाठी किंमत पट्टा (प्राईस बॅण्ड) ४२ ते ५० रुपयांदरम्यान निश्चित केली आहे.